Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/१२ वी/परीक्षा/ 1662
दिनांक :- १३/०८/२०२४

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
सातारा/ सांगली/ कोल्हापूर.

**विषय:-** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) फेब्रु-मार्च २०२५ परीक्षेस खाजगीरित्या प्रविष्ट (अर्ज क्र.१७ अन्वये) होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नावनोंदणी प्रक्रियेबाबत..

**संदर्भ:-** राज्य मंडळ, पुणे यांचे क्र.रा.मं./परीक्षा-३/३२०२-३ दि.१२/०८/२०२४

उपरोक्त संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने, सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) फेब्रु-मार्च २०२५ परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थ्यांची (फॉर्म नं.१७) ऑनलाईन नावनोंदणी दिनांक १३/०८/२०२४ पासून सुरु करण्यात येत आहे. यासंदर्भातील सर्व माहिती व मार्गदर्शक सूचना मंडळाच्या संकेतस्थळावर http://mahahsscboard.in प्रसिध्द करण्यात येत आहेत. तसेच याबाबतचे सविस्तर प्रकटन या पत्रासोबत देण्यात आलेले आहे.

१) खाजगी विद्यार्थ्यांनी इ.१२वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीनेच भरावयाचे आहेत. त्यामुळे कोणाचाही ऑफलाईन अर्ज स्वीकारला जाणार नाही. विद्यार्थ्यांचा मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी पुढील संपर्कासाठी अनिवार्य आहे. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रिंटआऊट, ऑनलाईन शुल्क भरल्याची पावती व हमीपत्र यासह दोन प्रतीत (Print out) व मूळ कागदपत्रे नावनोंदणी अर्जावर नमूद केलेल्या उच्च माध्य. शाळा/ क.महाविद्यालयात विहीत मुदतीत जमा करावयाची आहेत.

२) उच्च माध्य.प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांची नावनोंदणी ऑनलाईन पद्धतीने होणार असून नावनोंदणी करताना विद्यार्थ्यांच्या सध्याच्या पत्त्यातील (Current Address) जिल्हा, तालुका व त्याने निवडलेल्या माध्यम व शाखेनुसार (Stream), त्यास उच्च माध्य. शाळा/ क.महाविद्यालयांची यादी दिसेल, त्यामधील एका उच्च माध्य.शाळा/ क.महाविद्यालयाची निवड विद्यार्थ्याने करावयाची आहे.

३) एकदा नावनोंदणी अर्ज शाळेला ऑनलाईन सादर केल्यानंतर कुठल्याही स्तरावर त्रुटी पुर्ततेसाठी सदर अर्ज विद्यार्थ्यास प्राप्त झाल्यास विद्यार्थ्याला त्याचे नाव/ त्याचा सध्याचा पत्ता (Current address), शाखा (Stream), माध्यम, उच्च माध्य. शाळा/ क.महाविद्यालय यामध्ये कुठलाही बदल करता येणार नाही.

४) ज्या उच्च माध्य. शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यास शास्त्र, कला व वाणिज्य शाखेस प्रवेश घ्यायचा असेल, त्या उच्च माध्य. शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयास सदरच्या शाखेस मंडळाची मान्यता असणे आवश्यक आहे.

५) संबंधित उच्च माध्य. शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयाने ऑनलाईन /प्राप्त झालेल्या अर्जातील माहिती तसेच upload केलेल्या सर्व मूळ कागदपत्रांच्या प्रती उच्च माध्य. शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयात जमा असल्याबाबतची खात्री करावी व त्याची पडताळणी करुन माहिती/ कागदपत्रे अपूर्ण असल्यास सदर अर्ज "अपूर्ण" (Incomplate) या प्रकारे नोंदवून विद्यार्थ्याकडे त्रुटी पुर्ततेसाठी पाठवावयाचे आहेत व मूळ कागदपत्रे उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयामध्ये ठेवावयाचे आहेत.

६) पात्र (Eligible) विद्यार्थ्यांना नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी परीक्षेची आवेदनपत्रे मंडळाने विहीत केलेल्या कालावधीत परीक्षा शुल्कासह भरणे आवश्यक असल्याबाबतची सूचना विद्यार्थ्यांना उच्च माध्य. शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयामार्फत करुन द्यावी व आवेदनपत्रे भरल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्रे त्यांना परत करण्यात यावी.

७) या उच्च माध्य. शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज, प्रकल्प अंतर्गत मूल्यमापन, प्रात्यक्षिक/तोंडी, श्रेणी विषय संदर्भातील कामकाज व अनुषंगिक मूल्यमापन तसेच पुढील कार्यवाही करावयाची आहे व यासंदर्भातील गुण online पद्धतीने नोंदवून मंडळाकडे विहीत मुदतीत पाठवावयाचे आहेत व सदरचे गुणतक्ते प्रचलित पध्दतीप्रमाणे सिलबंद पाकिटात, पाकिटावर उच्च माध्य. शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव, सांकेतांक (Index No.) टाकून विभागीय मंडळाकडे जमा करावयाचे आहेत.

८) ज्या उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयातून विद्यार्थी परीक्षेचे आवेदनपत्र भरणार आहे, त्याच उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयामार्फत आवेदनपत्रासंदर्भातील अनुषंगिक कागदपत्रे जमा करावे लागतील.

९) परराज्यातील विद्यार्थ्यांनी फॉर्म नं.१७ भरला असेल तर, ज्या उच्च माध्य. शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयामार्फत संबंधित विद्यार्थी परीक्षेचे आवेदनपत्र भरणार आहे, त्या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत योग्यता प्रमाणपत्राचा (Eligibility Certificate) अर्ज online पद्धतीने विभागीय मंडळाकडे येणे आवश्यक आहे.

१०) उच्च माध्य. प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेसाठी प्रत्येक उच्च माध्य. शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयाने आपल्याच उच्च माध्य. शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयातील माजी विद्यार्थी, आपल्याच गावातील विद्यार्थी किंवा सध्याच्या पत्त्यानुसार नजीकच्या परिसरातील विद्यार्थी यांचेच नावनोंदणी अर्ज प्रवेशित क्षमतेच्या मर्यादेत (५० विद्यार्थी) स्वीकारावेत. तसेच ज्या उच्च माध्य.शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय आपल्या माजी विद्यार्थ्यांचे नाव नोंदणी अर्ज स्वीकारत नाहीत अशा उच्च माध्य./ कनिष्ठ महाविद्यालयांची तक्रार प्राप्त झाल्यास त्या उच्च माध्य. शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांविरुध्द कारवाई करण्यात येईल. प्रथम नावनोंदणी केलेल्या ५० विद्यार्थी क्षमतेपेक्षा जास्त म्हणजे ५१ ते १०० विद्यार्थी क्षमतेसाठी संबंधित उच्च माध्य. शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी परवानगी घेण्याकरीता विभागीय मंडळाकडे लेखी अर्ज करणे आवश्यक आहे.

**(सुभाष रा.चौगुले)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे–०४
## खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज
### • प्रकटन •

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना खाजगीरित्या फॉर्म नं. १७ भरुन परीक्षेस प्रविष्ट होण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

इ. १०वी व इ. १२वी परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थ्यांकरिता सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालये मंडळाच्या अटी शर्तीनुसार नावनोंदणी करण्याकरिता उपलब्ध आहेत. यासंदर्भातील सर्व माहिती व मार्गदर्शक पुस्तिका मंडळाच्या **http://www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहेत. तसेच अधिक माहितीसाठी सर्व विद्यार्थी/शाळा/कनिष्ठ महाविद्यालयानी आपल्या कार्यकक्षेतील विभागीय मंडळाशी संपर्क साधावा.

१ फेब्रु–मार्च २०२५ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज (फॉर्म न. १७) ऑनलाईन स्वीकारण्याच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आल्या आहेत –

| अ.क्र. | तपशील | नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्वीकारण्याच्या तारखा |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांनी नावनोंदणी अर्ज व शुल्क ऑनलाईन भरुन अर्जाची प्रत (print out), ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीची प्रिंटआऊट व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या शाळेत/कनिष्ठ महाविद्यालयात जमा करणे. | मंगळवार दि. १३/०८/२०२४ ते सोमवार दि. ३०/०९/२०२४ |
| २ | विद्यार्थ्यांनी विलंब शुल्काने नावनोंदणी अर्ज व शुल्क ऑनलाईन भरुन अर्जाची प्रत (print out), ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीची प्रिंटआऊट व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या शाळेत/कनिष्ठ महाविद्यालयात जमा करणे. | मंगळवार दि. ०१/१०/२०२४ ते बुधवार दि. ३०/१०/२०२४ |

२ खाजगी विद्यार्थ्यांना इ. १०वी व इ. १२वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन (online) पध्दतीनेच भरावयाचे आहेत. त्यामुळे कोणाचाही ऑफलाईन (offline) अर्ज स्वीकारला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

३ खाजगी विद्यार्थ्यांनी इ. १०वी/१२वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन भरण्यापूर्वी ज्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातून मंडळाची परीक्षा दयावयाची आहे, त्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात जाऊन शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचा सांकेतांक, विषय योजना, माध्यम, शाखा(Stream) व इतर आवश्यक माहिती घेऊनच नोंदणी करावी.

४ नावनोंदणी अर्ज करतांना विद्यार्थ्यांनी **http://www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावरील Student Corner या option चा वापर करावा. अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर मराठी/इंग्रजीमधून उपलब्ध आहेत, त्या वाचून अर्ज भरण्यास सुरुवात करावी.

५ विद्यार्थ्यांने अर्ज भरण्याकरिता १)शाळा सोडल्याचा दाखला(मूळ प्रत), नसल्यास द्वितीयप्रत व प्रतिज्ञापत्र २) आधारकार्ड ३) स्वत:चा पासपोर्ट आकारातील फोटो स्वत:जवळ ठेवावा. ऑनलाईन अर्ज भरतांना सदर मूळ कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावयाची आहेत. काही कारणास्तव विद्यार्थ्यांकडे दुय्यम शाळा सोडल्याचा दाखला असेल तर त्याची मूळ प्रत जोडणे आवश्यक आहे.

६ कागदपत्रे स्कॅन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्कॅनर/मोबाईलद्वारे कागदपत्रांचे फोटो (pdf) काढून ते upload करावेत. विद्यार्थ्यांचा मोबाईल क्रमांक व ई–मेल आयडी पुढील संपर्कासाठी अनिवार्य आहे.

७ विद्यार्थ्यांनी अर्ज, ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीची प्रिंटआऊट व मूळ कागदपत्रे नावनोंदणी अर्जावर नमूद केलेल्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात विहीत मुदतीत जमा करावयाची आहेत.

८ **खाजगी विद्यार्थी नावनोंदणी शुल्काचा तपशील खालीलप्रमाणे –**

इ.१०वी :– रु.१०००/– नाव नोंदणी शुल्क + रु.१००/– प्रक्रिया शुल्क(Processing Fee)

रु. १००/– विलंब शुल्क प्रति विद्यार्थी

इ.१२वी :– रु.६००/– नाव नोंदणी शुल्क + रु.१००/– प्रक्रिया शुल्क(Processing Fee)

रु. २५/– विलंब शुल्क प्रति विद्यार्थी

९ इ. १०वी/१२वी फेब्रु–मार्च २०२५ परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी (फॉर्म नं. १७) नावनोंदणी शुल्क ऑनलाईन पध्दतीने (Debit Card/Credit Card/UPI/Net Banking द्वारे) भरणे अनिवार्य राहील. ऑनलाईन पध्दतीने शुल्क जमा केल्याबाबतची पोचपावती विद्यार्थ्याला/संबधित शाळा/कनिष्ठ महाविद्यालयास त्यांच्या Login मध्ये प्राप्त होईल.

१० **अ)** माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांची नावनोंदणी ऑनलाईन पध्दतीने होणार असून नावनोंदणी करतांना विद्यार्थ्यांच्या सध्याच्या पत्त्यातील (Current Address) जिल्हा, तालुका व त्याने निवडलेल्या माध्यमानुसार, त्यास माध्यमिक शाळांची यादी दिसेल, त्यामधील एका माध्यमिक शाळेची निवड विद्यार्थ्याने करावयाची आहे. या माध्यमिक शाळेने परीक्षा अर्ज, प्रकल्प अंतर्गत मूल्यमापन, प्रात्यक्षिक/तोंडी, श्रेणी विषय संदर्भातील कामकाज व अनुषंगिक मूल्यमापन तसेच पुढील कार्यवाही करावयाची आहे.

**ब)** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांची नावनोंदणी ऑनलाईन पध्दतीने होणार असून नावनोंदणी करतांना विद्यार्थ्यांच्या सध्याच्या पत्त्यातील (Current Address) जिल्हा, तालुका व त्याने निवडलेल्या माध्यम व शाखेनुसार (Stream), त्यास उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांची यादी दिसेल, त्यामधील एका उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाची निवड विद्यार्थ्याने करावयाची आहे. या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाने परीक्षा अर्ज, प्रकल्प अंतर्गत मूल्यमापन, प्रात्यक्षिक/तोंडी, श्रेणी विषय संदर्भातील कामकाज व अनुषंगिक मूल्यमापन तसेच पुढील कार्यवाही करावयाची आहे.

११ दिव्यांग विद्यार्थ्यांना खाजगीरित्या प्रविष्ट व्हावयाचे असेल तर त्यांनी त्यांच्या दिव्यांगत्वाचे जिल्हा शल्य चिकित्सकांच्या प्राधिकृत केलेल्या रुग्नालयाच्या प्रमाणपत्र/UDID Card ची छायाप्रत प्रमाणित करुन अर्जासोबत सादर करावी व आवश्यकतेनुसार विभागीय मंडळ/माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी.

१२ महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळामार्फत इ. ५वी किंवा इ. ८वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना इ. १०वी साठी (१७ नं.) खाजगी विद्यार्थी म्हणून नावनोंदणी करता येईल.

१३ ऑनलाईन अर्ज भरतांना अडचण आल्यास कार्यालयीन वेळेत Website वर दिलेल्या Helpline वर संपर्क साधावा.

१४ **पात्र (Eligible) विद्यार्थ्यांना नावनोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) ऑनलाईन देण्यात येणार आहे, याची नोंद घ्यावी. तसेच पात्र (Eligible) विद्यार्थ्यांना नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी परीक्षेची आवेदनपत्रे (Examination Form) मंडळाने विहीत केलेल्या कालावधीत परीक्षा शुल्कासह भरणे आवश्यक** आहे.

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे – ०४

दिनांक – १२/०८/२०२४